महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी
(विभाग-नियंत्रण कक्ष सेतू)

दुरध्वनी क्रं. ०२४५२-२२३७०२ ई-मेल- rdcparbhani@gmail.com

# प्रेस नोट

महाराष्ट्र शासन माहिती व तंत्रज्ञान विभाग शासन निर्णय दि. १९/०१/२०१८ अन्वये परभणी जिल्हयामधील महा-ई सेवा केंद्र व आपले सरकार सेवा केंद्र अशा एकूण 611 केंद्रांना आपले सरकार सेवा केंद्र म्हणून या कार्यालयाने दि. २०/०३/२०१८ रोजी अधिसूचित केलेले आहे. तसेच परभणी जिल्हयाचे संकेतस्थळावर ज्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र नाही अशा एकूण 257 रिक्त ग्रामपंचायतीची यादी व आपले सरकार सेवा केंद्र नसलेल्या परभणी शहर-18, मानवत-1, सेलु-1 अशा एकूण 20 शहरी भागातील ठिकाणाची यादी प्रसिध्द केलेली आहे.

शासन निर्णय दि. १९/०१/२०१८ अन्वये परभणी जिल्हयामध्ये वर रिक्त ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र मिळणेसाठी इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०५/०४/२०१८ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत जिल्हा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालया परभणी येथे अर्ज करावा.

1.यापूर्वी दि.१९/१/२०१८ ते दिनांक ०५/०४/२०१८ या कालवधीत प्राप्त सर्व अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

२.अर्जदार यांनी एकावेळी एकच केंद्रासाठी अर्ज करावा.एकापेक्षा अनेक केंद्रासाठी अर्ज केल्यांस जो अर्ज प्रथम केलेला आहे तोच अर्ज ग्राहय धरण्यांत येईल.

३. अर्ज हा जिल्हयाच्या संकेतस्थळावर दिलेल्या विहीत नमुन्यात करुन अर्जासोबत सर्व कागदपत्र जोडून अर्ज सादर करावा.

४.आपले सरकार सेवा केंद्र मिळण्यासाठी दि. ०५/०४/२०१८ रोजी नंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५.आपले सरकार केंद्र ज्या ठिकाणी /ज्या प्रभागांत किंवा ज्या गावांत चालविण्यासाठी दिलेले आहे त्याच ठिकाणी चालविणे बंधनकारक राहील.

**जिल्हाधिकारी परभणी करीता.**